पुढारी

संक्षिप्त



नाशिक : सत्कारार्थींसह अजिंक्य वाघ, प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर आदी.

## विद्यार्थी, पालक, शिक्षक गुणगौरव

**नाशिक :** के. के. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातर्फे विद्यार्थी, शिक्षक तसेच पालकांचा गौरव करण्यात आला. वाघ शिक्षण संस्थेच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात दरवर्षीप्रमाणे यंदाही अखेरच्या वर्षात शिकत असणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'प्लेसमेंट ड्राइव्ह'चे आयोजन केले जाते. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये १६५ राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांनी ५५० हून अधिक विद्यार्थ्यांची प्लेसमेंटमध्ये निवड झाली. या विद्यार्थ्यांचा गौरव संस्थेतर्फे करण्यात येतो. यंदा निवड झालेल्या ८८ विद्यार्थी, त्यांच्या पालकांचा गौरव वाघ अभियांत्रिकीतर्फे संस्थेचे जनसंपर्क संचालक अजिंक्य वाघ व प्राचार्य डॉ. के. एन. नांदूरकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी विभागप्रमुख डॉ. एस. एम. कमलापूर, डॉ. पी. बी. कुशारे, डॉ. पी. डी. भामरे, डॉ. आर. के. मुंजे, डॉ. सुनील कुटे, डॉ. व्ही. सी. बागल व डॉ. पी. जे. पवार हे उपस्थित होते.

Nashik Edition
May 23, 2025 Page No. 04
Powered by: erelego.com